पूर्वा कृषिदूत
प्रबोधनातून परिवर्तन... मासिक

संस्थापक संपादक
डॉ. बी.बी. पवार

संपादक
डॉ. भास्कर गायकवाड

संपादन सहयोग
पराग वाड

चित्रांकन आणि मांडणी
कैलास भामरे

मुखपृष्ठ
विजय सैंदाणे

व्यवस्थापक - लेखा विभाग
राजेंद्र बागुल

सहकार्य
विजय पवार
संचालक, पूर्वा ॲग्रोटेक

सुहास कदम
संचालक, पूर्वा ॲग्रो मार्केटिंग

महेश पाटील
संचालक, पूर्वा केमटेक, खान्देश

विजय नाईकरे
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, पुणे

सचिन दिघे
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, संगमनेर

रईस इनामदार
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, कोपरगाव

नंदकिशोर चतरकर
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, विदर्भ

संजय पाटील
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, मराठवाडा

■

पूर्वा केमटेक प्रा.लि.,
एम ११३, एमआयडीसी अंबड,
नाशिक-४२२०१०
मो. ७४२००१४७८१
email:poorvakrushidoot@gmail.com

## संपादकीय

# शेतीसाठीचे मनुष्यबळ; चिंता आणि चिंतन



डॉ. भास्कर गायकवाड
(संपादक : 'पूर्वा कृषिदूत')
मो. ९८२२५१९२६०
gaikwadbh@yahoo.com

- बेरोजगार तरुण शेतीत राबायला तयार होत नाहीत
- कारखानदारी, बांधकाम क्षेत्राचेच नव्या पिढीला आकर्षण
- वाढत्या शहरीकरणामुळे घटते आहे उपजाऊ जमिनीचे क्षेत्र
- शेतीच्या यांत्रिकीकरणाला आता व्यापक प्राधान्य हवे
- कृषी निविष्ठांच्या अनुदानाचे निकषही बदलले पाहिजेत
- संस्थात्मक नियोजनातून गटशेतीला प्रोत्साहन आवश्यक

**मा**णसे तसेच पशुधन यांना चांगला- मुबलक पोषक आहार मिळावा म्हणून शेती पद्धतीचा विकास झाला. मागील हजारो वर्षांमध्ये शेतीमध्ये अनेक स्थित्यंतरे झाली. परंतु मागील एक शतकाचा विचार केला तर शेती क्षेत्रात फार मोठे बदल झाले किंवा ते करावे लागले, असे लक्षात येते. शेतीमध्ये ज्या ज्या वेळी समस्या निर्माण झाल्या किंवा समाजाला आवश्यक असलेले शेती उत्पादन कमी पडले; त्या त्या वेळी शेतीमध्ये बदल झाले. आपल्या देशाचा विचार केला तर १९६० नंतर हरितक्रांती झाली आणि त्यानंतर शेती क्षेत्रात अनेक मोठे बदल झाले. देशाच्या स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवी पर्वात मागे वळून बघताना काही बाबी नक्कीच लक्षात घेतल्या पाहिजेत. देशाची लोकसंख्या ३६ कोटींवरून १३७ कोटींपर्यंत पोहोचली. म्हणजे लोकसंख्या ३.८१ पटीने वाढली. त्यावेळी पूर्ण दोनवेळचे खायला अन्नधान्य नव्हते. आपण त्यावेळी फक्त १०.६० कोटी टन अन्नधान्य उत्पादन घेत होतो. त्यामध्ये वाढ होऊन आज ९३.६० कोटी टनांपर्यंत उत्पादन वाढले. म्हणजे शेती उत्पादनात ८.८३ पट वाढ झाली. शेतीचे उत्पन्न २.९१ लाख कोटींवरून २१.१५ लाख कोटींपर्यंत वाढले. म्हणजे यामध्ये ७.९७ पट वाढ झाली; अर्थात

याच दरम्यान देशाच्या एकूण उत्पन्नामध्ये २८.४४ पट वाढ झाली. शेतीमधून अन्नधान्य उत्पादन वाढून सर्वांना फक्त दोनवेळचे खायला मिळाले एवढेच नव्हे तर शेतीमालाची निर्यातही वाढली. हरितक्रांतीच नव्हे तर धवलक्रांती (दुग्ध व्यवसाय), फलोत्पादन क्रांती, नीलक्रांती (मत्स्य व्यवसाय), मधुक्रांती (मधमाशी पालन) यांबरोबरच कडधान्ये, तेलबिया यांच्या उत्पादन वाढीसाठीही अनेक प्रयत्न झाले आणि त्याला चांगले यशही आले. आज पीक उत्पादन वाढीचा वेग २.५५ टक्के असून फलोत्पादन ४.५३ टक्के, दुग्ध व्यवसाय ५.३६ टक्के, मत्स्य व्यवसाय ७.१० टक्के या दराने दरवर्षी वाढ होत आहे, ही एक चांगली बाब आहे. या सर्व चांगल्या बाबी दिसत असल्या तरी एका बाजूला भूतकाळाचा विचार करून आणि भविष्याचा वेध घेऊन वर्तमानकाळात यावर काहीतरी ठोस भूमिका घेतली तरच शाश्वत जीवन जगता येते. हाच खरा यशाचा मार्ग आहे. आतापर्यंत आपण भूतकाळाचा विचार केला, आता भविष्यकाळावर थोडासा प्रकाश टाकू.

## जगभर शेतमजुरांची संख्या घटते आहे

वातावरणामध्ये मोठ्या प्रमाणात बदल होत आहे. जमिनीची प्रत खालावते आहे, त्यामुळे उत्पादकता कमी होत आहे, अनेक पिके रासायनिक निविष्ठांना पाहिजे त्या प्रमाणात प्रतिसाद देत नाहीत. उत्पादन खर्चात वाढ होत असताना त्या प्रमाणात पीक उत्पादन आणि साहजिकच आर्थिक उत्पन्न मिळत नाही. लोकसंख्या वाढत असल्यामुळे भविष्यात अन्नधान्याची मागणी वाढणार आहे. उत्पादन घेण्यासाठी शेतीखालची जमीन शहरीकरण- औद्योगीकरण यांमुळे कमी होत आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे शेती करण्यासाठी मनुष्यबळाची कमतरता जाणवते आहे. बाकीच्या प्रश्नांपेक्षा सर्वात महत्त्वाचा आणि गंभीर प्रश्न भविष्यात जाणवणार आहे तो म्हणजे शेतीसाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ. हा प्रश्न फक्त महाराष्ट्र किंवा भारतापुरताच मर्यादित नाही तर तो संपूर्ण जगालाच भेडसावणारा प्रश्न असून, पूर्ण जगामध्ये हा प्रश्न फार गंभीर होणार आहे. मागील ४० वर्षांत देशातील शेती क्षेत्रात असलेल्या मनुष्यबळाचे प्रमाण ४० टक्क्यांवरून २३.३ टक्क्यांपर्यंत खाली आले आहे. महाराष्ट्रात हेच प्रमाण २६.९ टक्क्यापर्यंत आहे तर केरळसारख्या राज्यात फक्त ८.५ टक्के आहे. ज्या राज्यात जास्त लोक शिक्षित झाले तेथील शेतीमधील मनुष्यबळ सर्वात कमी झाले. एकूण शेतीमधील मनुष्यबळापैकी तरुण मनुष्यबळ फक्त १४.४ टक्के आहे. गावातील तीन कामगारांपैकी एकच कामगार शेतीवर काम करतो तर दोन कामगार बांधकाम व्यवसाय किंवा इतर क्षेत्रांत काम करतात. शेतीमधील मनुष्यबळ कमी होत असताना त्याचे सरासरी वयही वाढत आहे. मागील २० वर्षांपूर्वी शेतीतील मनुष्यबळाचे सरासरी वय ३५ होते, ते आज ४० झाले आहे. म्हणजे मनुष्यबळ कमी होत असताना त्याचे सरासरी वयही वाढत आहे. ग्रामीण भागातील महिलांचा शेती क्षेत्रात काम करण्यासाठीचा सहभाग कमी होत आहे. ज्या कुटुंबाची आर्थिक स्थिती चांगली झाली त्या कुटुंबांतील महिला शेतीमध्ये काम करत नाहीत. पूर्वीच्या काळी हे प्रमाण जास्त होते. पूर्वी शाळेतील मुलेही शेतीकामामध्ये हातभार लावत असत. आज २१-२२ वर्षापर्यंतची तरुण पिढी शिक्षणामध्ये व्यस्त असल्यामुळे त्यांचा शेती क्षेत्रात काम करायला हातभार लागत नाही.

## वावरातल्या महिलांची टक्केवारी निराशाजनक

शेती क्षेत्रातील महिला मनुष्यबळाचे प्रमाण मागील २० वर्षांत ३५ टक्क्यांवरून १६ टक्क्यांपर्यंत घटलेले आहे आणि ते आणखी घटण्याची शक्यता आहे. कारण आज ७० टक्के महिला बेरोजगार असूनही त्यांना शेती क्षेत्रामध्ये काम करण्याची इच्छा नाही. तरुणांचीही हीच परिस्थिती आहे. आज ३६ टक्के तरुण बेरोजगार आहेत, परंतु ते शेतीमध्ये काम करायला तयार नाहीत. आज काम करणाऱ्या सात तरुणांपैकी फक्त एकच तरुण शेतीमध्ये काम करत आहे; अर्थात यापेक्षाही अनेक तरुण मनापासून काम करतात की त्यांचा नाईलाज म्हणून ते काम करतात, हा एक वेगळा विषय आहे. राज्याचा- देशाचा विचार करत असताना जागतिक पातळीवर

हीच समस्या कशी आहे आणि त्याला त्यांनी कशा पद्धतीने पर्याय शोधले याचाही विचार केला पाहिजे. लोकसंख्येचा विचार केला तर भारत आणि चीनची तुलना होऊ शकते. चीनमध्येही १९८० पर्यंत अन्नधान्याचा प्रश्न गंभीर होता. परंतु १९८० नंतर त्यांनी शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणात परिवर्तन करून ३०-४० वर्षांत अन्नधान्य उत्पादनासह, इतरही बाबतीत जगातील एक नंबरचा देश म्हणून नावलौकिक मिळविला. वाढलेल्या लोकसंख्येला समस्या न मानता तिला त्यांनी संधी समजून त्यासाठी या सर्व हातांना काम दिले आणि मोठी क्रांती झाली. अर्थात त्यावेळी आणखी एक निर्णय चीनने घेतला तो म्हणजे 'एक कुटुंब- एक मूल' हे धोरण. चीनची लोकसंख्या नियंत्रणात आली; परंतु आज चीनमध्ये ग्रामीण भागातील समाज कमी होत असून, चीनमध्ये १४१ कोटी समाजापैकी फक्त ५१ कोटी समाज ग्रामीण भागात राहतो. १९८० मध्ये ७० टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून होती. त्याचे प्रमाण आता ३५ टक्क्यांपर्यंत कमी झाले आहे. शेतीमध्ये काम करणाऱ्या मनुष्यबळाची संख्या १३.७ टक्क्यांपर्यंत खाली आली. तसेच शेतीमध्ये काम करणाऱ्या मनुष्यबळाचेही वय वाढत असताना तरुण पिढी शेती क्षेत्रात येण्यास जास्त उत्सुक नाही. अमेरिकेसारख्या प्रगत देशात शेतीवर फक्त २.५ टक्के समाज अवलंबून आहे. अर्थात तेथेही मागील ७५ वर्षांत शेतकरी कुटुंबांची संख्या ७० लाखांवरून २० लाखांपर्यंत कमी झाली आणि जमीनधारणा ८३ हेक्टरवरून १८० हेक्टर प्रति शेतकरी झाली. याच काळात शेतीवरील मनुष्यबळाचे प्रमाण २३ लाखांवरून ११ लाखांपर्यंत कमी झाले. अमेरिकेमध्ये इतर अनेक देशांतून शेतमजुरांना तात्पुरता व्हिसा देऊन त्यांच्याकडून कामे करून घेतली जातात. अर्थात ज्या देशांतून मजूर येत होते तेथेही शैक्षणिक प्रगती आणि आर्थिक व सामाजिक विकास झाल्यामुळे साहजिकच तेथून येणाऱ्या मजुरांची संख्या कमी होत आहे. मजुरांच्या अभावामुळे अमेरिकेसारख्या प्रगत देशामध्ये अंदाजे २० टक्के शेतमाल शेतामध्येच राहतो आणि शेतकऱ्याचे नुकसान होते. देशाचा विकास होत असताना एकीकडे शहरीकरण वाढत आहे तर दुसरीकडे ग्रामीण भागातील समाजाचे स्थलांतर होत आहे.

## रोडावणारे कृषी- मनुष्यबळ ही समस्या की संधी?

२०५० पर्यंत आपल्या देशाची लोकसंख्या १६५ कोटी असेल, त्यापैकी ८७ कोटी समाज शहरात तर ७८ कोटी समाज ग्रामीण भागात असेल. वाढलेल्या लोकसंख्येच्या पोटापाण्यासाठी शेती उत्पादन घेण्याची जबाबदारी कमी होत असलेल्या शेतकरी- मजुरांवर येत आहे. अर्थात या समस्येला समस्या न समजता ती एक संधी आहे असा विचार करून भविष्याचे योग्य नियोजन केले तर शेती क्षेत्राचा निश्चितच शाश्वत विकास होईल.

जागतिक पातळीवर शेतीमध्ये मनुष्यबळाचा तुटवडा जाणवत आहे आणि तो पुढील काळात जास्त प्रमाणात जाणवणार आहे. प्रगत देशांमध्ये ही समस्या मागील ३-४ दशकांपासून आहे तर प्रगतिशील देशांमध्ये याची सुरुवात झाली आहे आणि भविष्यात हा विषय चिंतेचा होणार आहे. युरोप- अमेरिकेसारख्या प्रगत देशांमध्ये हा प्रश्न निर्माण झाला आणि त्यावर त्यांनी अनेक उपाययोजना केल्या. आशिया खंडातील अनेक देशांना ही समस्या आता जाणवू लागली आहे. आफ्रिकेतील देशांमध्ये आजही ७० टक्क्यांपर्यंत समाज शेतीवर अवलंबून आहे. आपल्या देशाचा विचार केला तर मागील ५० वर्षांमध्ये शहरीकरण वाढत असून, २०५० पर्यंत ५२ टक्के समाज शहरात तर ४८ टक्के समाज खेड्यात असेल; खरं तर अन्नधान्य उत्पादनासाठी शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची आवश्यकता असते. परंतु शिक्षण आणि प्रगतीमुळे आजची तरुण पिढी शेतीमध्ये येण्यासाठी जास्त उत्सुक नाही. यामुळेच अवघी १४.३ टक्के तरुण पिढी आज शेतीमध्ये आहे- ज्याचे प्रमाण भविष्यामध्ये घटू शकते! दुर्दैवाने अशी परिस्थिती निर्माण झाली तर शेतीमध्ये काम करायला मनुष्यबळच नसेल आणि याचा परिणाम शेती व्यवसायावर होऊन भविष्यात देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी राहील की नाही, ही शंका आहे.

आज शेतीमधील कमी होत असलेल्या मनुष्यबळाव्यतिरिक्त शाश्वत शेती उत्पादन, हवामानातील बदल, खर्चाच्या मानाने उत्पादनात वाढ न होणे, आरोग्यानुकूल शेती उत्पादनाची गरज, शेतमाल निर्यातीतील जागतिक स्पर्धा, शेती तंत्रज्ञान निर्मिती आणि प्रसार तसेच अल्प- अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांचे अस्तित्व यांसारखे अनेक प्रश्न- समस्या आहेत. या सर्व समस्यांवर मात करत असताना शेतीमधील मनुष्यबळ शाश्वत ठेवून शेती उत्पादन वाढविणे हे एक मोठे आव्हान आहे. हे आव्हान पेलण्यासाठी योग्य ते नियोजन करावे लागणार आहे. यातूनच भविष्यात कृषी क्षेत्रात प्रगती- विकास करायला मोठी संधी आहे, असे म्हणता येईल. आपल्याकडे म्हण आहे- 'प्रश्नातून संशोधन होते आणि समस्येतून संधी सापडते.' आजच्या ग्राहकामध्ये मोठा बदल होत आहे. आर्थिक सुबत्ता आली म्हणजे खाण्याच्या सवयी आणि आवड निवड बदलते. अलीकडे अन्नधान्याची मागणी कमी होऊन फळे- भाजीपाला, दुग्धजन्य पदार्थ, चिकन- मटण, मासे तसेच इतर आरोग्यदायी उत्पादनाला मागणी वाढत आहे. त्यामुळेच मागील दोन दशकांमध्ये फलोत्पादन, पशुसंवर्धन- दुग्ध व्यवसाय तसेच मत्स्यपालन या क्षेत्रांच्या वाढीचा वेग पुरवठ्यापेक्षा जास्त राहिला, तर अन्नधान्याच्या वाढीचा वेग २ ते ३.५ टक्क्यांपर्यंत राहिला. पुढेही असाच ट्रेंड राहिला तर या तीनही क्षेत्रांमध्ये काम करायला मोठा वाव आहे. अर्थात या तीनही क्षेत्रांमध्ये मनुष्यबळ जास्त प्रमाणात लागते. आपला सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे तीनही क्षेत्रात काम करायला कुशल मनुष्यबळ नाही. तसेच या तीनही क्षेत्रांमध्ये पाहिजे त्या प्रमाणात आधुनिकीकरण, यांत्रिकीकरण झालेले नाही.

## कृषिक्षेत्रात यांत्रिकीकरणावर भर देणे आवश्यक

आजचा तरुण शेती क्षेत्रामध्ये काम करायला तयार होईल. परंतु त्याला 'डॉन्की वर्क' नको तर 'स्मार्ट वर्क' पाहिजे. शेती क्षेत्रामध्ये 'व्हाईट कॉलर जॉब' तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याची गरज आहे. पिकांच्या लागवडीपासून ते काढणीपर्यंत सर्व कामे यांत्रिकी पद्धतीने कशी करता येतील यावर भर द्यावा लागेल. भारतीय शेती ही अल्प- अत्यल्पभूधारक शेतकरी करत असून, जमिनीचे अनेक लहान लहान तुकडे झालेले आहेत. अशा परिस्थितीमध्ये अनुकूल अशी शेती औजारे- मशिनरी तयार करण्याची गरज आहे. चीनमध्ये आपल्यासारखीच परिस्थिती आहे, तरी त्यांनी जवळ जवळ शेतीचे ५७ ते ६० टक्क्यांपर्यंत यांत्रिकीकरण केलेले आहे. युरोप- अमेरिकेसारख्या देशांमध्ये तर ८० टक्क्यांपेक्षा जास्त यांत्रिकीकरण झाले आहे. या यांत्रिकीकरणासाठी त्यांनी तेथील मनुष्यबळाला योग्य प्रशिक्षण देऊन कुशल केले आहे- जेणेकरून मजूर कमी वेळेत जास्त पैसे कमावतील आणि शेतकऱ्यांचीही खर्चामध्ये बचत होईल. पारंपरिक रासायनिक खतांऐवजी ड्रिपद्वारे फर्टिगेशन, पाणी व्यवस्थापनासाठी सूक्ष्म सिंचन पद्धत, तण व्यवस्थापनासाठी तणनाशके, जैवतंत्रज्ञानाचा वापर करून तणनाशक विरोधक पिकांच्या वाणांची निर्मिती, कीटकनाशके, फवारणीसाठी ड्रोनचा वापर, पिकांचे काढणीपश्चात तंत्रज्ञान, साठवणूक आणि विक्री व्यवस्था आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, या सर्व बाबींचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणे ही काळाची गरज आहे. जगामध्ये शेतीसाठी रोबोटचा वापर सुरू झाला आहे. आपल्याकडेही भविष्यात होईलच. सद्य:स्थितीत शेतीच्या यांत्रिकीकरणाला प्राधान्य देण्याची गरज आहे. तसेच ज्या निविष्ठा, बी- बियाणे शेतीमधील मजुरांचा प्रश्न सोडविण्यासाठी उपयोगी ठरतील, त्यांसाठी जास्तीत जास्त अर्थसाह्याची गरज आहे. आजच्या पारंपरिक शेती- अनुदान पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल करण्याची तयारी सरकार तसेच शेतकऱ्यांनी ठेवली तरच यातून मार्ग निघेल. तेलंगणा- आंध्र प्रदेशमध्ये मागील पाच वर्षांपासून कृषी क्षेत्रातील एकूण बजेटपैकी ४० टक्के बजेट हे शेतीच्या यांत्रिकीकरणासाठी राखीव ठेवले आहे. तसे बघता आता यांत्रिकीकरणासाठी शासनाचे अनुदान मिळते, हजारो शेतकरी अर्ज करतात; त्यांपैकी काही शेतकऱ्यांनाच याचा लाभ मिळतो. याऐवजी मागेल त्या शेतकऱ्याला शेती औजारे- मशिनरी दिली तर

शेतीमध्ये यांत्रिकीकरणाला गती येईल. याच यांत्रिकीकरणातून अनेक बेरोजगार ग्रामीण तरुणांना रोजगार मिळेल आणि मजुरांची समस्या कमी होण्यास मदत होईल.

## ताजी फळे, भाजीपाला यांना प्रगत देशांमध्ये पसंती

आज जागतिक पातळीवर विशेषत: प्रगत देशांमध्ये प्रक्रिया केलेल्या पदार्थांपेक्षा ताजी फळे/ भाजीपाला यांना मागणी जास्त आहे. अमेरिकेमध्ये ताज्या फळांची आयात ३० लाख टनांवरून १६० लाख टनांपर्यंत तर युरोपीय देशांमध्येही २० लाख टनांवरून ८० लाख टनांपर्यंत वाढली आहे. दुग्धजन्य पदार्थ, मटण- चिकन यालाही चांगली मागणी आहे. या क्षेत्रामध्ये कुशल मनुष्यबळ तयार करून काही प्रमाणात यांत्रिकीकरण करता आले तर आंतरराष्ट्रीय पातळीवर निर्यातीसाठी फार मोठी संधी आहे. पुढील २ ते ३ दशके यांत्रिकीकरण वाढीचा वेग हा १० टक्क्यांपेक्षा जास्त राहणार आहे. याचा फायदा शेतीमधील 'स्टार्ट अप्स्'साठी चांगला होऊ शकतो. अर्थात यासाठी तंत्रज्ञान संशोधन आणि तंत्रज्ञान प्रसार यंत्रणांनी जास्तीत जास्त काम करण्याची गरज आहे. आपल्या देशाने अनेक क्षेत्रांतील संशोधनामध्ये जागतिक पातळीवर आघाडी घेतलेली असली तरीही शेती क्षेत्रामध्ये मात्र आपण मागे राहिलेलो आहोत, हे मान्य करावेच लागेल. शहरांमध्ये लोकसंख्या वाढत असताना बेरोजगारीचा प्रश्न निर्माण होणार आहे. यावर उपाय म्हणून शहरांमध्ये किंवा शहरांलगत अर्बन फार्मिंग आणि त्यामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती उत्पादनात वाढ करता येईल तसेच शहरातील मनुष्यबळाचा तेथेच वापर करता येईल. ग्रामीण भागातील अल्पभूधारक शेतकरी सर्व प्रकारचे यांत्रिकीकरण करून शेती करू शकणार नाही; ते त्याला परवडणारही नाही, हे लक्षात घेतले पाहिजे.

केरळसारख्या राज्यामध्ये फक्त ८.५ टक्के मनुष्यबळ शेतीवर राहिल्यामुळे तेथे पाच लाख हेक्टर जमीन पडीक होती. तेथे महिला बचत गट तसेच पुरुषांचे गट तयार करून, त्यांना 'जॉईंट लायबिलिटी ग्रुप'चा आधार देऊन पीक कर्ज तसेच इतर शेतीचे फायदे देण्यात आले. त्यामुळे आज केरळमध्ये ५० हजारांपेक्षा जास्त गट तयार होऊन एकत्रित शेती करत आहेत. यासाठी ते आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत आहेत. हिमाचल प्रदेशामध्ये नेपाळहून येणारे मजूर कमी झाल्यामुळे तेथे सफरचंदाची काढणी करण्याची मोठी समस्या निर्माण झाली. आज तेथे ३० ते ४० टक्के मजुरांची कमतरता आहे. यावर उपाय म्हणून त्यांनी सफरचंद शेतीमध्ये अनेक कामे करण्यासाठी करार पद्धतीने शेती सुरू करून या समस्येवर मार्ग काढला आहे. भविष्यात शेतकरी गट, महिला गट, शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था यांच्या माध्यमातून गटशेतीचा मार्ग स्वीकारावा लागणार आहे. गटशेतीच्या माध्यमातून शेतीचे लहान लहान तुकडे एकत्र करून या शेतीमध्ये यांत्रिकीकरणाला प्रोत्साहन द्यावे लागेल. कारण भविष्यात मोठ्या प्रमाणात शेती करणारा वर्ग हा वयस्कर असेल, अल्पभूधारक असेल- ज्याला शेती करणे किफायतशीर होणार नाही. शेतीच्या आधुनिकीकरणासाठी गटशेतीला प्रोत्साहन, शेतीच्या यांत्रिकीकरणासाठी शासनाची भरीव आर्थिक तरतूद, प्रशिक्षणाच्या माध्यमातून शेतीमध्ये कुशल मनुष्यबळ निर्मितीद्वारे ग्रामीण युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे, संशोधनाच्या माध्यमातून भारतीय शेतीसाठी योग्य यंत्रसामग्री तयार करणे तसेच माहिती तंत्रज्ञानाची साथ देणे यांसारख्या बाबींसाठी एक ठोस कालबद्ध कृती कार्यक्रम तयार केला पाहिजे. असे झाले तरच भविष्यात शेतीमध्ये कमी होत असलेल्या मनुष्यबळाला पर्याय मिळेल आणि आलेल्या संधीचे सोने होऊन देशातील कृषी क्षेत्रात भरीव प्रगती साधेल. ■

हे मासिक मालक, मुद्रक, प्रकाशक संजय भास्कर पवार यांनी निर्मल ऑफसेट प्रा.लि., बी २७, एम.आय.डी.सी. माळेगाव, ता. सिन्नर, जि. नाशिक येथे छापून ४, मिथिला अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्राजवळ, दातेनगर, गंगापूर रोड, नाशिक- ४२२०१३ येथे प्रकाशित केले.

संपादक : डॉ. भास्कर गायकवाड

* या अंकातील लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.